13 OCT 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनवृत्ती, रोजगाराभिमुखता वाढीवर लक्ष

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के : शिवाजी विद्यापीठात विद्यार्थीकेंद्रित शाश्वत प्रकल्पांची उभारणी

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १२ : शिक्षण, मूल्यमापन, पायाभूत सुविधा, संशोधनवृत्ती, रोजगारनिर्मिती, पेटंट आणि त्याच्या व्यावसायिक उपयोजनांच्या अनुषंगाने पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणाचे प्रयोजन बदलत आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठात विद्यार्थीकेंद्रित शाश्वत प्रकल्पांच्या उभारणीवर माझा भर आहे. संशोधनवृत्ती, रोजगाराभिमुखता वाढीवर लक्ष केंद्रित केले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्यापीठाने गुणवत्तापूर्ण झेप घेण्यासाठी पाऊले टाकली जात आहेत. पुढील दोन वर्षांत त्यात निश्चितपणे चांगले यश मिळेल, असा विश्वास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज येथे 'सकाळ'च्या 'कॉफी वुईथ सकाळ' या व्यासपीठावरून व्यक्त केला.**



### विद्यापीठाचे भविष्यातील उपक्रम

- अद्ययावत कुस्ती संकुलाची उभारणी
- महाराष्ट्र-तंजावर यांच्यातील ऐतिहासिक बंधांचा अभ्यास
- वाणिज्य, कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या नव्या इमारतीचे बांधकाम
- बटर फ्लाय गार्डनची उभारणी, लीड बोटॅनिकल गार्डनचा विस्तार
- संगणक केंद्राची क्षमता वाढणार
- ऑनलाईन एमबीए., एम. कॉम., एम. एस्सी. गणित, कॉम्प्युटर सायन्स अभ्यासक्रमांची सुरुवात

coffee वुईथ सकाळ

कुलगुरूपदाच्या कारकीर्दीला तीन वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने त्यांनी मुक्तपणे संवाद साधला. संपादक निखिल पंडितराव यांनी त्यांचे स्वागत केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, नव्या अभ्यासक्रमांची सुरुवात, पायाभूत सुविधांची उभारणी, रोजगाराची उपलब्धता, आदींबाबत विद्यापीठाने टाकलेल्या पावलांची त्यांनी माहिती दिली. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''माझी कुलगुरूपदी नियुक्ती कोविडच्या कालावधीत झाली. कोविडचा सामना करत दोन वर्षे परीक्षा घेण्याचे आव्हान यशस्वीपणे पेलले. विद्यापीठ आणि विद्यार्थी विकासाच्यादृष्टीने ज्या संकल्पना मी मांडल्या. त्याला प्राचार्य, प्राध्यापक, संस्थाचालक, कर्मचारी, विद्यार्थी या घटकांनी पाठबळ दिले. त्यामुळे मला अधिक चांगल्या पद्धतीने काम करता आले. स्थापनेची ६० वर्षे पूर्ण करणाऱ्या राज्यातील अन्य विद्यापीठांमध्ये शिवाजी विद्यापीठ अव्वलस्थानी आहे. पण, समाधानी राहिले की प्रगती थांबते, असे मी मानतो. त्यामुळे विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांमध्ये कौशल्यपूर्ण शिक्षण, संशोधनवृत्ती, रोजगाराभिमुखता, पायाभूत सुविधा वाढीची अधिक ठोस पावले यापुढील काळात टाकली जातील.''

### यशस्वी वाटचालीची पंचसूत्री

डॉ. शिर्के म्हणाले, ''उच्चशिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण, संशोधनातून उद्योगनिर्मिती, नावीन्यपूर्ण व अभिनव संशोधन, गुणवत्तापूर्ण शिक्षण, भविष्यवेधी कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम या पंचसूत्रीनुसार आणि अधिकार मंडळांच्या पाठबळावर सर्वांना बरोबर घेऊन विद्यापीठाला यशस्वीपणे पुढे नेत आहे. प्रत्येक दिवस मी कामाचा समजतो. विद्यापीठ विकासाचा अजेंडा घेऊन विद्यार्थीकेंद्रित शाश्वत प्रकल्पांची पूर्तता यापुढील कालावधीत मी करणार आहे. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी प्रशासनाची भक्कम घडी बसविली आहे. जरी आता सेवकांची संख्या कमी झाली असली, तरी प्रशासन कामातील गतीमध्ये कायम आहे.''

### उत्तरपत्रिका मूल्यमापनाचे नवे मॉडेल

कमी वेळेत उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करून निर्धारित मुदतीत परीक्षांचे निकाल जाहीर करण्याच्या नव्या मॉडेलची यशस्वी अंमलबजावणी केली. त्यामुळे उन्हाळी सत्रातील ६८० पैकी ६७८ परीक्षांचे निकाल ३० दिवसांत जाहीर झाले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये विद्यापीठाने राज्यात आघाडी घेतली असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

### कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम

डॉ. शिर्के म्हणाले, ''संलग्नित महाविद्यालये स्वायत्त, क्लस्टर होण्याची संख्या येत्या १० वर्षांत आणखी वाढणार आहे. त्याचा विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशावर परिणाम होईल. ते टाळण्यासाठी विद्यापीठाकडून कौशल्याधिष्ठित नवे अभ्यासक्रम सुरू केले जात आहेत. त्यात सध्या बी. एस्सी.-एम. एस्सी. एकात्मिक अर्थशास्त्र, बी. ए. स्पोर्टस्, फिल्म मेकिंग, बीसीए अभ्यासक्रम सुरू केले आहेत.''

### 'प्लेसमेंट' भक्कम करणार

डॉ. शिर्के म्हणाले, ''प्लेसमेंट'मध्ये अपेक्षित टक्का विद्यापीठाला गाठता येत नसल्याची खंत आहे. त्यामुळे 'प्लेसमेंट' अधिक भक्कम करण्यासाठी कौशल्यावर आधारित नवे अभ्यासक्रम सुरू केले जात आहेत. उद्योग-व्यवसायाची भाषा, गरज लक्षात घेऊन विद्यार्थी घडविण्यासाठी इंटर्नशिपवर भर दिला जाणार आहे. कोणत्या स्वरूपातील मनुष्यबळाची कोणत्या उद्योगांना गरज आहे, विद्यार्थ्यांना कोणत्या क्षेत्रात काम करायचे आहे, त्याचा डाटाबेस तयार करण्याचे काम सुरू आहे. सेक्शन-८ कंपनीच्या माध्यमातून स्टार्ट-अप, इन्क्युबेशनला बळ दिले जात आहे.

### तडजोड खपवून घेणार नाही

डॉ. शिर्के म्हणाले, ''नवीन आणि जुन्या महाविद्यालयांतून गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी मी आग्रही आहे. त्यामुळे महाविद्यालयांची अचानकपणे जाऊन पाहणी करण्याच्या सूचना संलग्नता देणाऱ्या प्रक्रियेतील समितीला केल्या आहेत. गुणवत्तेबाबत तडजोड विद्यापीठ खपवून घेणार नाही.''

### 'सोशल कनेक्ट' वाढीवर भर

राजर्षी शाहू महाराज स्मृतिशताब्दी कृतज्ञता पर्व, आजादी का अमृतमहोत्सव, स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन आदी उपक्रमांच्या माध्यमातून विद्यापीठाचा 'सोशल कनेक्ट' वाढविला आहे. तसेच लोकसहभागातून मुलींसाठी वसतिगृहाची उभारणी केली जात असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

लोकमत

# डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी, शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान

## डॉ.राजन गवस : १२५ व्या जयंतीनिमित्त विद्यापीठात चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** डॉ. पंजाबराव देशमुख हे गोरगरीब शेतकऱ्यांविषयी तळमळ बाळगणारे कृषी आणि शिक्षण क्षेत्रामध्ये मोठे योगदान देणारे तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभाग, गांधी अध्यासन केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्यासन आणि अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था यांच्यातर्फे विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र अधिविभागामध्ये 'डॉ.पंजाबराव देशमुख : व्यक्ती, विचार आणि कार्य' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले. चर्चासत्राच्या उद्घाटन सत्रामध्ये बीजभाषक म्हणून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गवस बोलत होते. अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.



शिवाजी विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात ज्येष्ठ लेखक राजन गवस यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, भारताच्या कृषिक्रांतीचे जनक डॉ. देशमुख यांच्या व्यक्ती आकलनामधील प्रेरणा शोधण्याची गरज आहे आणि हे कार्य या दोन दिवसीय चर्चासत्रामध्ये होणे आवश्यक आहे. डॉ. रवींद्र भणगे यांनी प्रास्ताविक केले. राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी पाहुण्याचा परिचय करून दिला. डॉ. नेहा वाडेकर यांनी सुत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार सुधीर भोंगळे यांच्यासहविद्यार्थी, विद्यार्थीनी, शिक्षक उपस्थित होते.

पुढारी

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषी, शैक्षणिक क्षेत्रातील तेजस्वी व्यक्तिमत्त्व : डॉ. गवस

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. पंजाबराव देशमुख यांना गोरगरीब शेतकऱ्यांविषयी तळमळ होती. कृषी आणि शिक्षण क्षेत्रामध्ये मोठे योगदान देणारे ते तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र अधिविभागामध्ये 'डॉ. पंजाबराव देशमुख : व्यक्ती, विचार आणि कार्य' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. गवस म्हणाले, आज, ज्ञानाची साधने वाढून नवीन तंत्रज्ञानाची ओळख झाली. आपली माणसे आपणांस अनोळखी झालेली आहेत. सर्व शिक्षण संस्थेमध्ये बहुजनांची मुले शिकली पाहिजेत. त्यांच्या घरात शिक्षण गेले पाहिजे असे विचार बाळगणारे उत्तुंग व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. पंजाबरावदेशमुख होय.

हर्षवर्धन देशमुख म्हणाले, डॉ. देशमुख यांच्या जडणघडणीमध्ये कोल्हापूरच्या छ. शाहू महाराजांचे मोठे योगदान आहे. त्याचबरोबर, कर्मवीर भाऊराव पाटील यांना आदर्श मानून त्यांनी पुढील जीवनामध्ये भरीव कार्य केले. डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, भारताच्या कृषक क्रांतीचे जनक डॉ. देशमुख यांच्या व्यक्ती आकलनामधील प्रेरणा शोधण्याची गरज आहे.

डॉ. रवींद्र भणगे यांनी प्रास्ताविक केले. राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. नेहा वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# कृषी, शिक्षण क्षेत्रात डॉ. देशमुख यांचे योगदान : डॉ. गवस

**कोल्हापूर :** डॉ. पंजाबराव देशमुख हे गोरगरीब शेतकऱ्यांविषयी तळमळ बाळगणारे, कृषी आणि शिक्षण क्षेत्रामध्ये मोठे योगदान देणारे तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग, गांधी अध्यासन केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्यासन व श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र अधिविभागात 'डॉ. पंजाबराव देशमुख : व्यक्ती, विचार आणि कार्य' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. उद्घाटन सत्रामध्ये बीजभाषक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. रवींद्र भणगे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. नेहा वाडेकर यांनी केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले. यावेळी, अमरावती येथील शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप हंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, सुधीर भोंगळे यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक आणि संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

13 OCT 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कला दाखविण्यासाठी तरुणांनी रात्र जागविली!

## सादरीकरणासाठी धडपड; महोत्सवस्थळी सळसळता उत्साह, संधीचे सोने करण्यासाठी पहाटेपर्यंत सुरु होता सराव

प्रगती जाधव-पाटील
लोकमत न्यूज नेटवर्क

दहिवडी: मध्यवर्ती युवा महोत्सवात सादरीकरणासाठी मिळालेल्या संधीचे सोने करण्याची धडपड प्रत्येक संघात बघायला मिळते. मिळेल त्या ठिकाणी आणि असेल त्या अवस्थेत पाठांतराबरोबरच नृत्य आणि अभिनयाचा सराव करताना विद्यार्थी महोत्सव स्थळी दिसत होते. कोणाला पराभूत करण्यापेक्षा स्वतः विजयी होण्यासाठी मुलांनी अक्षरशः रात्र जागविली.

दहिवडी येथील रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेजकडे ४३व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे यजमानपद आहे. त्यामुळे महाविद्यालयात विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या उत्साहाची अलोट गर्दी अनुभवायला मिळत आहे. सराव पूर्ण झाल्यानंतर अंतिम कला सादर करण्यापूर्वी रंगमंचाचा अंदाज घेणे महत्त्वाचे असते. त्यामुळे दिवसभर रंगमंचाच्या आसपास राहून दिवसभरातील कार्यक्रम विद्यार्थ्यांनी अनुभवले. बुधवारी रात्री पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाचा समारोप झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी रंगमंचावर सादरीकरणाचा सराव सुरू केला.

अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने भल्या पहाटेपर्यंत विद्यार्थ्यांचा हा सराव सुरू होता. एक-दोनदा सराव केल्यानंतर प्रत्येकाला पुढच्या स्पर्धकांसाठी रंगमंच उपलब्ध करून द्यायचा होता. त्यामुळे आवश्यक तेवढे सराव रंगमंचावर करून विद्यार्थी परतले.




दहिवडी येथे सुरु असलेल्या युवा महोत्सवात गुरुवारी एका महाविद्यालयाच्या तरुणांनी कलाविष्कार सादर केला. (छाया : अनिल बिटले, पुसेगाव)

### ना इर्षा ना गेमा!

मध्यवर्ती युवा महोत्सवात सातारा, सांगली आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्यांतून स्पर्धक सहभागी झाले आहेत. विविध कलाविष्कार सादर करताना परस्परांना प्रोत्साहन देण्याची तरुणाईची स्टाईल वाखाणण्याजोगी होती. आपापला प्रयोग झाला की, प्रेक्षकांमध्ये बसून आपल्यापेक्षा कोणाचा कलाविष्कार चांगला झाला, याची चर्चा करण्याबरोबरच रंगमंचावर असणाऱ्या स्पर्धकांना टाळ्यांच्या कडकडाटाने प्रोत्साहन देत होते.



शिवाजी विद्यापीठ
मध्यवर्ती युवा महोत्सव

13 OCT 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सोशल मीडियावर महाविद्यालयीन तरुणाईचा घणाघात

## स्थळ छायाचित्रण प्रकार : गरजेचा मोबाइल डोकेदुखी का झाला याची केली विद्यार्थ्यांनी कल्पक मांडणी

**दहिवडी:** शिक्षणाची गरज म्हणून मुलांच्या हातात आलेल्या मोबाइलने त्यांचे अवघे विश्वच पोखरून काढले आहे. तरुणाईला याचं व्यसन लागलंय आणि मोबाइलचे त्यांच्या आयुष्यावर काय परिणाम होतात, याची त्यांना कल्पना नाही असा सार्वत्रिक समज आहे. हा समज खोडून काढत सोशल मीडियाच्या अतिवापरावर तरुणाईने सांघिक रचनाकृतीद्वारे घणाघात केला आहे.

दहिवडी येथे रंगलेल्या ४३ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात विद्यार्थ्यांनी साकारलेली टाकाऊपासून टिकाऊची कलाकृती विशेष आकर्षणाचे केंद्र ठरली. मोबाइल आणि त्याचे परिणाम दुष्परिणाम यासह युवा महोत्सव अशी थीम विद्यार्थ्यांना देण्यात आली होती. बहुतांश विद्यार्थ्यांनी मोबाइल आणि त्याचे परिणाम, दुष्परिणाम यावर सडेतोड भाष्य केले.

मोबाइलमुळे ओस पडलेले क्रीडांगण, कुटुंब एकत्र असूनही वेगवेगळ्या विश्वात रमणारे कुटुंबीय, यासह समाजमाध्यमाद्वारे पेरल्या गेलेल्या विषयामुळे उद्भवणारी सामाजिक परिस्थिती यावरही नेमक्या पद्धतीने भाष्य करण्यात तरुणाई यशस्वी झाल्याचे चित्र महोत्सवात पाहायला मिळते.



दहिवडी (ता. माण) येथे सुरू असलेल्या युवा महोत्सवात तरुणाईने सांघिक रचनाकृतीद्वारे सोशल मीडियाच्या अतिवापरावर घणाघात केला आहे.


(छाया : प्रगती जाधव-पाटील)

### हाती आलं पण पवित्र नाही झालं!

१ कोरोना काळात ज्या मोबाइलने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष पुढे नेले, त्याच मोबाइलच्या अतिवापराने महाविद्यालयीन वयात मुलांचे वर्षही वाया गेले. कोरोना काळात हाती आलेला मोबाइल पवित्र वाटत होता. त्यानंतर मात्र त्याचं पावित्र्य राहिलं नाही. मोबाइल वापरासह समाजमाध्यमातील कोणत्या गोष्टीने आपल्याला मागे सारले, असे आत्मचिंतन करायला इथल्या कलाकृतींनी भाग पाडले.

### पुस्तक आणि मोबाइलचीही तुलना!

२ दहिवडी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या रचना कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी पुस्तक आणि मोबाइल यांची तुलना करणारी कलाकृती सादर केली. पुस्तकांच्या तुलनेत मोबाइलवरचा खर्च वाढला असला, तरी दर्जा आणि ज्ञानाच्या बाबतीत पुस्तक सरस असल्याचे यात मांडण्यात आले आहे. मोबाइल दुकानातील गर्दी आणि ग्रंथालयातील ओसपणाही या कलाकृतीतून परखडपणे मांडण्यात आला.



कोरोना काळात सोशल मीडियामुळे शैक्षणिक नुकसान टाळता आले. पण त्याचे दीर्घकालीन परिणाम आताच्या पिढीला सहन करावे लागत आहेत. हाती आलेल्या स्मार्टफोनचा वापर कसा करावा, याची माहिती नसल्याने होणाऱ्या गोंधळाविषयी विद्यार्थ्यांनी उत्तम भाष्य केले आहे.

- केवल यादव, कलाकार, कोल्हापूर

लोकमत



दहिवडी, ता. माण येथे सुरू असलेल्या युवा महोत्सवात गुरुवारी तरुणांनी एकांकिका सादर केल्या. त्यातून सामाजिक विषयांवर भाष्य करण्यात आले. (छाया : प्रगती जाधव-पाटील)

# एकांकिकांमधून सामाजिक विषयांचा जागर!

**दहीवडी:** येथे सुरू असलेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवात दुसरा दिवस गाजला तो एकलगायन, समूहगायन, एकपात्री, शास्त्रीय नृत्य यासह एकांकिका, वादन, गायन आणि रेखाटन यामुळे. एकांकिका स्पर्धामधून विद्यार्थ्यांनी संवेदनशीलपणे मांडलेली सामाजिक परिस्थिती विशेष भाव खाऊन गेली. सातारा, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतून मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी दाखल झालेल्या तरुणाईने दुसरा दिवसही 'फुल ऑन एनर्जी'ने साजरा केला. दहीवडी महाविद्यालय परिसरात उभारण्यात आलेल्या नऊ रंगमंचांवर आपले कलागुण सादर करताना विद्यार्थ्यांनी विविध विषयांना स्पर्श करत वस्तुस्थिती मांडण्याचा प्रयत्न आपल्या कलेच्या माध्यमातून केला.

## संगीत, शास्त्रीय नृत्य कलांनाही प्रोत्साहन

मध्यवर्ती युवा महोत्सवात लोककला आणि एकांकिकेबरोबरच यंदा प्रेक्षकांनी संगीत आणि शास्त्रीय नृत्यालाही पसंती दिली. विविध रंगमंचावर सुरू असलेल्या या कार्यक्रमांना उपस्थिती लावून स्पर्धकांचे मनोबल वाढविण्याचा प्रयत्न रसिक प्रेक्षकांनी केला. प्रेक्षकांच्या प्रतिसादाने कला सादर करणाऱ्यांना आणखी हुरुप आला.

## कुंचल्यातून कागदावर अवतरले महाविद्यालय!

स्थळचित्रण प्रकारात सहभागी झालेल्या स्पर्धकांनी आपल्या कुंचल्यातून महाविद्यालय परिसर रेखाटला. महाविद्यालयाच्या क्रीडांगण, प्रवेशद्वार, ग्रंथालय, जिमखाना, हॉस्टेल आदी ठिकाणे स्पर्धक विद्यार्थ्यांनी कागदावर रेखाटली.

## कॉलेज कोडने ओळख

सातारा, सांगली आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्यांमधून शंभराहून अधिक संघ मध्यवर्ती युवा महोत्सवात सहभागी झाले आहेत. या संघांची ओळख पटू नये, म्हणून महाविद्यालयांना कोड ठरवून दिला आहे. स्पर्धकांना कोड विचारून प्रवेशित करण्यात येत होते.

## विषय आणि अभिनय बिनतोड!

युवा महोत्सवानिमित्त नऊ संघांनी एकांकिका सादर केल्या. या एकांकिकांचे विषय समाजाचा वेध घेणारे, पारंपरिक रुढी- परंपरांना आव्हान देणारे, याबरोबरच तरुणाईमध्ये स्फुरण भरणारे होते. विषयाच्या निवडीबरोबरच त्याचे सादरीकरण करतानाही विद्यार्थ्यांनी जीवतोड मेहनत घेतली. अव्वल क्रमांक द्यायचा, असा प्रश्न उपस्थित व्हावा, असे सादरीकरण झाले.

तरुण भारत

# विद्यापीठात शनिवारी 'शिवजागर' कार्यक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभाग, छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र, कृष्णा पब्लिकेशन आणि सह्याद्री प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार १४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता 'शिवजागर' कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. 'शिवराज्याभिषेक': भारताच्या इतिहासातील असामान्य घटना' या ग्रंथावर विचारमंथन होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार शिवराज्याभिषेकाचे हिंदुस्थानाच्या इतिहासातील स्थान या विषयावर मार्गदर्शन करतील. ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर 'शिवराज्याभिषेक आणि अधिमान्यतेचा प्रश्न या विषयावर मार्गदर्शन करतील. तर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे 'शिवराज्याभिषेक : इतिहासाचा प्रवाह बदलणारी घटना' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

13 OCT 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाला आतापर्यंत १५ पेटंट

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठांतर्गत अनेक संशोधक प्राध्यापक, विद्यार्थ्यांचा जागतिक पातळीवरील संशोधकांच्या यादीत समावेश झाला आहे. जवळपास १३ संशोधक टॉप टूमध्ये आहेत. त्यांनी समाजोपयोगी व औद्योगिक क्षेत्राला उपयुक्त संशोधन केले आहे. या संशोधकांच्या कौशल्यावरच आतापर्यंत विद्यापीठाने १५ पेटंटची कमाई केली आहे. सध्या विद्यापीठाच्या ९८ पेटंट फाईल मंजूर झाल्या आहेत. तसेच ८३ पेटंटच्या मान्यतेची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळेच विद्यापीठाने जागतिक संशोधनात दबदबा कायम ठेवला आहे.



- समाजोपयोगी, औद्योगिक क्षेत्रात संशोधनात दबदबा कायम
- सध्या ९८ पेटंट फाईल मंजूर, ८३ पेटंटसाठी मान्यतेची प्रक्रिया सुरू

तरुण भारत संवाद
विशेष वृत्त

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर सुरुवातीला संशोधनाचे प्रमाण कमी होते. अलीकडे संशोधन, पेटंटसंदर्भात जागृती वाढू लागली, संशोधकांनीही विविध सामाजिक व औद्योगिक विषयावर संशोधन सुरू केले. औद्योगिकरणासाठी उपयोगी वस्तू, चांदी उद्योगाचे वेस्ट, कॅन्सर, डायबेटीस, भाताचे विविध प्रकारचे वाण, नांगरणी यंत्र, दुषित पाणी विघटन, जल, वायू प्रदुषण, रेशीम उद्योग, कोल्हापुरी गुळ आदी विषयावर भरपूर संशोधन झाले आहे. परिणामी १५ पेटंटची विद्यापीठाने कमाई केली आहे. याद्वारे संशोधकासह विद्यापीठाचीही प्रगती होत आहे.

### पेटंटच्या माध्यमातून संशोधकांसह विद्यापीठाची प्रगती

विद्यापीठात समाजोपयोगी, औद्योगिक संशोधन करून विद्यापीठाचा लौकिक वाढवला आहे. संशोधनातून पेटंटवर आपला हक्क सांगणे महत्वाची गोष्ट आहे. पेटंटच्या माध्यमातून संशोधकांसह विद्यापीठाची प्रगती होते आहे. त्यामुळे भविष्यात पेटंटची संख्या वाढवण्याचा प्रयत्न राहील.

डॉ. पी. एस. पाटील (प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)

पेटंटच्या संख्येवरच आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्यापीठांचे मूल्यांकन केले जाते. पेटंटच्या वाढत्या संख्येमुळेच शिवाजी विद्यापीठ 'नॅक' मूल्यांकनात राज्यात अव्वल ठरले आहे. जागतिक पातळीवरील संशोधन क्रमवारीत येणाऱ्यांची विद्यापीठातील संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. नुसतेच ॲकॅडेमिक काम न करता समाजातील अडचणी समजून घेऊन त्यावर संशोधनातून कायमस्वरूपी व शाश्वत उपाययोजनांवर संशोधन केले जात आहे. विज्ञान शाखेबरोबरच समाजशास्त्र शाखेतही संशोधकांची संख्या वाढत असल्याचे आंतरराष्ट्रीय क्रमवारीतील आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त पेटंट मिळावी, यासाठी विद्यापीठ प्रशासनाकडून संशोधकांना संशोधन ते पेटंट फाईलपर्यंत सर्वतोपरी मदत केली जात आहे. म्हणूनच शिवाजी विद्यापीठ संशोधनासह गुणवत्तेत अव्वल आहे.

**परदेशी विद्यापीठांशी सामंजस्य करार**

संशोधनाला चालना देण्यासाठी अनेक देशांतील विद्यापीठांशी शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केले आहेत. त्यातून विद्यापीठाचे विद्यार्थी, संशोधक परदेशी विद्यापीठांत जाऊन संशोधन करतात, तेथील विद्यार्थी, संशोधनासाठी इकडे येतात. यातून देवाणघेवाण केली जात आहे.

### विद्यार्थ्यांना मिळतेय शिष्यवृत्ती

वैज्ञानिक युगात संशोधनाला अतिशय महत्व आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना संशोधनाची गोडी लागावी यासाठी विद्यापीठ प्रशासनाने पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी शिष्यवृत्ती देऊन प्रोत्साहन दिले जात आहे. त्यामुळे महाविद्यालय पातळीवरील विद्यार्थ्यांच्या संशोधनाचा पाया पक्का होत असून, पुढे जाऊन ते संशोधक होतील, अशी विद्यापीठाला आशा आहे.

### विद्यापीठाच्या स्टार्टअपमधून संशोधकांना मदत

संशोधक प्राध्यापक व विद्यार्थ्यांना स्टार्टअपतून त्यांच्या संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मदत केली जात आहे. त्यामुळे या केंद्राकडे शेकडो संशोधकांनी संकल्पनेतून संशोधनाची फाईल पाठवली आहे. यापैकी काहींना विद्यापीठासह राज्य शासनाकडून स्टार्टअपसाठी आर्थिक मदत केली जात आहे.